एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम, महाराष्ट्र
सार्वजनिक आरोग्य विभाग

## मुंबईतील दोघांना ओमायक्रॉन विषाणूचा संसर्ग – राज्यातील एकूण ओमायक्रॉन रुग्ण संख्या १०

दिनांक ६ डिसेंबर २०२१

**प्रेस नोट**

---

राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने दिलेल्या अहवालानुसार, आज मुंबईतील आणखी २ जणांना ओमायक्रॉन विषाणूचा संसर्ग झाल्याचे सिध्द झाले आहे.

यामुळे महाराष्ट्रातील ओमायक्रॉन विषाणू आढळलेल्या रुग्णांची संख्या आता १० झाली आहे.

- जोहांसबर्ग ( दक्षिण आफ्रिका) हून दिनांक २५ नोव्हेंबर २०२१ रोजी मुंबईत आलेल्या ३७ वर्षीय पुरुषाला ओमायक्रॉन विषाणूची बाधा झाल्याचे सिध्द झाले आहे.
- या रुग्णासोबत राहिलेल्या आणि २५ नोव्हेंबरला अमेरिकेहून आलेल्या त्याच्या ३६ वर्षीय मैत्रिणीला देखील या विषाणूची बाधा झाल्याचे प्रयोगशाळा अहवालातून समोर आले आहे.
- या दोघांना कोणतीही लक्षणे नाहीत. हे दोन्ही रुग्ण सेव्हन हिल्स रुग्णालयात भरती आहेत.
- या दोन्ही रुग्णानी फायझर लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत.
- या दोन्ही रुग्णांच्या ५ अतिजोखमीच्या आणि ३१५ कमी जोखमीच्या निकटसहवासितांचा शोध घेण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरु आहे.

दरम्यान १ डिसेंबर पासून आज सकाळपर्यंत राज्यातील मुंबई, पुणे आणि नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर करण्यात आलेल्या तपासणीचा तपशील खालीलप्रमाणे आहे –

| एकूण आलेले प्रवासी | | | आर टी पी सी आर केलेले प्रवासी | | | आर टी पी सी आर बाधित आणि जनुकीय तपासणीसाठी नमुने पाठविण्यात आलेले रुग्ण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अतिजोखमीचे देश | इतर देश | एकूण | अतिजोखमीचे देश | इतर देश | एकूण | अतिजोखमीचे देश | इतर देश | एकूण |
| ६२६३ | २८४३७ | ३४७०० | ६२६३ | ६३५ | ६८९८ | ११ | ० | ११ |

या शिवाय राज्यात १ नोव्हेंबर पासून आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे देखील क्षेत्रिय पातळीवर सर्वेक्षण सुरु आहे. विमानतळ आणि क्षेत्रीय सर्वेक्षणातून आतापर्यंत ३४ प्रयोगशाळा नमुने जनुकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

विषाणूमध्ये बदल होणे ही नैसर्गिक प्रक्रिया असून या बाबत जनतेने भीती न बाळगता आपल्या नेहमीच्या व्यवहारात कोविड अनुरुप वर्तनाचा अंगिकार करावा, नागरिकांनी आपले लसीकरण पूर्ण करावे आणि मागील महिनाभरात जे प्रवासी आंतरराष्ट्रीय प्रवास करुन भारतात आले आहेत त्यांनीही आपल्या बाबत स्थानिक आरोग्य विभागास अवगत करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने सर्व जनतेला करण्यात आले आहे.

*****